# पोलीस व जनता यांच्या सौहार्दपूर्ण सहकार्य व श्रमदानातून झुरी नाल्यावरील पुलाजवळील रस्त्याची दुरूस्ती

एटापल्ली ते कसनसुर रस्त्यावर असणाऱ्या झुरी नाल्यावरील पावसाने नादुरुस्त झालेल्या पुलाजवळील रस्त्याची गावकऱ्यांच्या सोबतीने पोमके हालेवाराच्या अधिकारी व कर्मचारी यांनी आज दिनांक २०/०८/२०१७ रोजी श्रमदानातुन दुरुस्ती केली.

झुरी नाल्यावरील पुलामुळे एटापल्ली तालुक्यातील उपपोस्टे कसनसुर पोमके कोटमी, आणि हालेवारा हद्दीतील जवळपास ८० गावे एटापल्ली तालुक्याशी जोडली जातात. परंतू पावसामुळे झुरी नाल्यावरील पुलाजवळील रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था झाली होती. यामुळे या भागातील बस सेवा ही बंद झाली होती तसेच लोकांना पुलावरुन ये- जा करण्यासाठीही त्रासाचे होत होते. यामुळे आज पोमके हालेवारा पोलीस जवानांनी हातात फावडे घेवून गावातील सर्व महीला, पुरुष, युवक असे सर्वांच्या मदतीने झुरी नाल्यावरील पुला शेजारील रस्त्याची श्रमदान करुन दुरुस्ती केली. पोमके हालेवारा येथील पोउपनि निलेश डाबेराव, सीआरपीएफ- १९१ बटालीयनचे असिस्टंट कमांडन्ट ब्रिजेशकुमार तसचे जिल्हा पोलीस दल व एसआरपीएफचे कर्मचारी यांनी अथक श्रमदान करुन सदरचा रोड तयार केला. श्रमदानातून व सहकार्यातून मोठया वाटणाऱ्या समस्या सहज सोडविता येतात असा संदेश जणू पोलीस दल व गावकऱ्यांनी सर्वांना दिला आहे.





